MHBI100020692019

## नियमीत दिवाणी दावा क्रमांक ५५६/२०१९ मधील निशाणी क्र. ३२ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी त्यांच्याविरुध्द दि.१६.१२.२०२१ रोजी पारित करण्यात आलेला उलटतपास नाहीचा आदेश रद्द करुन त्यांना वादीचा उलटतपास घेण्याची परवानगी देण्याच्या विनंतीसह सादर केलेला आहे.

२. प्रतिवादी यांनी अर्जामध्ये असे नमुद केले आहे की, सदर प्रकरणातील वादीने दावा दिल्या नंतर प्रतिवादीला दाव्याची समन्स मिळाल्यानंतर प्रतिवादी हा वेळेत जवाबदावा देवु शकला नाही. त्यामुळे मा. न्यायालयाने सदर प्रतिवादी विरूध्द नो क्रॉस चा आदेश केल्यानंतर सदर प्रकरणातील वादीने त्याचे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले व सदर पुराव्याचे शपथपत्रावर मा. न्यायालयाने उलट तपासाला प्रतिवादी अथवा त्यांचे वकील हजर राहु शकले नाहीत. म्हणुन मा. न्यायालयाने प्रतिवादी विरूध्द दिनांक १६/१२/२०२१ रोजी नो. क्रॉस चा आदेश केलेला आहे.  त्यानंतर मा. न्यायालयाने सदर प्रकरणात दिनांक १९/१२/२०२४ रोजी मुद्दे निश्चित करून प्रकरण वादीचे पुराव्यासाठी ठेवले होते. परंतु, सदर वादी हा प्रकरणात पुरावा देण्यासाठी बरेच तारखाला आला नाही व शेवटी सदर वादीने हजर होवुन प्रतिवादीने जवाबदावा देणेपुर्वी दिलेले पुराव्याचे शपथपत्र पुढे गृहीत धरावे अशी पुरसीस दाखल करून प्रकरण उलट तपासासाठी ठेवले. करीता, सदर अर्ज दाखल केला आहे. वास्तविक या प्रतिवादींनी वादीचा उलटतपास घेण्याचे जाणीवपुर्वक व हेतु पुरस्सर टाळलेले नाही. प्रस्तुत प्रकरण जमीनीशी संबंधीत असुन, साक्षीदाराचा उलटतपास न घेतल्यास या प्रतिवादीचे अतोनात व कशानेही भरून न येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे त्यांच्या  विरूध्द झालेला उलटतपास नाहीचा आदेश रद्द करण्याची विनंती केली आहे.

३. वादीच्या विद्वान विधिज्ञांनी अर्जाच्या पाठिमागील पानावर म्हणणे सादर करत असे कथन केले आहे की, प्रतिवादी यांना सदरील प्रकरणातील कार्यवाहीबाबत संपुर्ण माहिती होती. तरी देखील वादी यांना न्यायापासुन वंचीत ठेवण्यासाठी व प्रकरण प्रलंबीत ठेवण्यासाठी सदरचा अर्ज दिलेला आहे. वादी यांना जाणीव पुर्वक मानसिक व आर्थिक त्रास देण्यासाठी सदरचा अर्ज दिलेला आहे. करिता, अर्ज नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

४. अर्जाचे, त्यावरील म्हणण्याचे आणि अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही बाजुच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा हा वादींनी करारपुर्ती करून देणेबाबत दाखल केलेला आहे. प्रस्तुतच्या दाव्यात दोन्ही पक्षकारांचे स्थावर मिळकतीसंदर्भात हक्क व अधिकार विवादीत करण्यात आलेले आहेत. यात काही एक शंका नाही की, प्रतिवादी यांना वारंवार संधी दिल्यानंतर देखील त्यांनी वादीचा उलटतपास न घेतल्यामुळे त्यांच्याविरुध्द दिनांक १६/१२/२०२१ रोजी उलटतपास नाही असा आदेश पारित करण्यात आलेला होता. यावरून असे दिसुन येते की, प्रतिवादी यांना वारंवार संधी देवुन देखील ते वादीचा उलटतपास घेवु शकले नाहीत. परंतु, दाव्यात विवादीत केलेले तथ्य विचारात घेता, सदरचा दावा गुणदोषावर निकाली काढण्याच्या दृष्टीने प्रतिवादी यांना वादीचा उलटतपास घेण्याची संधी देणे न्यायोचित होईल. प्रतिवादी यांनी वादीचा उलटतपास घेण्यात केलेला उशीर त्यांच्यावर योग्य तो खर्च लादुन माफ करता येईल. तसेच दाव्याच्या वयाचा विचार करता, प्रतिवादी यांनी दाव्यास अजुन उशीर करु नये यासाठी त्यांना कुठल्याही परिस्थितीत पुढील तारखेस उलटतपास घेण्याबाबत आदेशीत करणे योग्य होईल. एकुणच वरनमुद कारणांचा विचार करता, खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. निशाणी क्रमांक ३२ वरील अर्ज रक्कम रुपये २०००/- च्या खर्चावर आणि पुढील तारखेस कुठल्याही परिस्थितीत वादीचा उलटतपास घेण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी विरुध्द पारीत करण्यात आलेला उलटतपास नाही असा आदेश रद्द करण्यात येत आहे.

३. प्रतिवादी यांनी पुढील तारखेपावेतो खर्चाची रक्कम रुपये २०००/- न्यायालयात जमा केल्यास ती वादींना देण्यात यावी. यदाकदाचित सदरची रक्कम पुढील तारखेपावेतो न्यायालयात जमा न करण्यात आल्यास ती हुकूमनाम्यात समाविष्ठ करण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by POURNIMA VIJAY CHAVAN
Date: 2026.03.12 17:55:39 +0530

(पी.व्ही. चव्हाण)
२रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
केज.

दिनांक:- १२.०३.२०२६.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/ order.

Dictated on : 12.03.2026

Transcribed on : 12.03.2026

Checked & signed on : 12.03.2026

Sd/-

(P. P. Raut),

Stenographer Grade-3,

Ct. of CJJD and JMFC, Kaij.